S.N.D.T. Mumbai University
MRT COLLEGE FOR WOMEN'S, AMRAVATI
Address : Prashant Vidyalaya Campus, Prashant Nagar, Garden Chowk, Ramnagar, Amravati Dist. Amravati.
(B.A., B.Com., B.Sc., B.A.in Fashion Design, Free Admission)
M.A., M.Com., M.Sc.
SC, OBC, ST, VJ, NT, SBC
Government Scholarship Applicable to All Student
Contact :- 9022915943

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक
हिंदुस्थान
७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे
www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com

अब कॅम्प अमरावती में
मिठाइयाँ | नमकीन | केक | नाश्ता | बेकरी प्रोडक्ट्स
डागा प्लाझो, डी मार्ट के सामने, कॅम्प, अमरावती
85000-11122 | 80015-56000
रघुवीर मिठाइयाँ

■ वर्ष ७६ वे/अंक २९६ वा ■ ■ अमरावती,रविवार दिनांक १४ जून २०२६ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर २४ ज्येष्ठ १९४८ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.००

लष्करी विमान कोसळून ५ जवानांना वीरमरण

गुवाहाटी दि. १३ : शनिवारी, सकाळी १० वाजताच्या सुमारास आसामच्या जोरहाटमधील भारतीय हवाई तळाजवळ, एक लष्करी विमान कोसळून मोठी दुर्घटना झाल्याची बातमी समोर आली होती. याबाबत आता एक हृदयद्रावक अपडेट समोर आली आहे. या भीषण अपघातात ५ जवानांना वीर गती आली असून, एक को-पायलट गंभीर जखमी झाला आहे.

दरम्यान, अँटोनोव्ह एएन-३२ हे दोन इंजिन असणारे टर्बोप्रॉप मिलिटरी ट्रान्सपोर्ट विमान, जोरहाच हवाई तळाच्या आजूबाजूच्या परिसरात कोसळले. या भीषण अपघातावेळी विमानात एकूण किती जवान स्वार होते, याचा अधिकृत आकडा अद्याप समोर आलेला नाही. मात्र यामध्ये ५ जवानांना त्यांचे प्राण गमवावे लागले. स्क्वाड्रन लीडर प्रशांत सिंह, फ्लाईट लेफ्टनंट शुभम कुमार, सार्जंट जितेंद्र शर्मा, अग्निवीरवायू खेमाराम कुमावत, अग्निवीरवायू दानिश आलम या वीरांचा समावेश होता. तसेच जखमी झालेल्या को-पायलटचे नाव अद्याप समोर आलेले नाही. मात्र, इंडियन एअर फोर्सने पूर्ण यादी जाहीर केल्यावरच पुढील माहिती समोर येईल, असे स्पष्ट केले आहे. *(उर्वरित पान २ वर)*

लोकसभेत सत्ता समीकरण बदलणार?

मतदारसंघ पुनर्रचना विधेयकासाठी बहुमताचा आकडा जुळला?

नवी दिल्ली दि. १३ : सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी लोकसभेत आता अधिक मजबूत होण्याच्या तयारीला लागली आहे. ताकद वाढवण्यासाठी देशात सर्वदूर प्रयोग सुरू आहेत. ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसचा फुटीर गटाने १९ खासदारांच्या समर्थनाचा दावा केला आहे. तर विरोधी गटातील अजून एका पक्षाला सुरूंग लावण्याचा प्रयत्न अंतिम टप्प्यात असल्याची वार्ता येऊन धडकली आहे. तर द्रमुक पक्षाच्या २२ खासदारांचे पाठबळ मिळण्यासाठी कसरत सुरू आहे. मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर करण्यासाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला लोकसभेत ३६० जागांची गरज आहे. त्यादृष्टीने दिल्लीसह त्या त्या राज्यात बड्या घडामोडी घडत आहेत.

१९ खासदारांची ममता आटली

ममता बॅनर्जी यांनी राजकारणाच्या प्रवाहात आणलेले अनेक खासदारांची ममता आता आटली आहे. त्यांनी तृणमूलमध्येच वेगळा घरोबा केला आहे. पक्षात मोठी बंडाळी उठली आहे. पक्षातील २९ पैकी १९ खासदारांनी एक वेगळा गट स्थापन केल्याची चर्चा आहे. त्यांनी लोकसभा अध्यक्षांकडे स्वतंत्र आसन व्यवस्थेची मागणी केली आहे. त्यामुळे लोकसभेत सत्ताधाऱ्यांच्या बाजूने १९ खासदारांचे बळ वाढण्याची शक्यता आहे. एनडीएचा बहुमताचा आकडा २९३ *(उर्वरित पान २ वर)*

पाकिस्तानला पाण्याचा एक थेंबही देणार नाही सिंधू जल करारावरुन राजनाथ सिंहांचा थेट इशारा



नवी दिल्ली दि. १३ : दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या आणि मानवतेच्या शत्रूंपर्यंत सिंधू नदीचे पाणी आम्ही कोणत्याही परिस्थितीत पोहोचू देणार नाही. रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही, अशा कडक शब्दांत भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानला सुनावले आहे. तेलंगणा भाजपच्या वतीने हैदराबाद येथे आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. पहलगाम येथील भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऐतिहासिक पाऊल उचलत सिंधू जल करार स्थगित केला आहे. याच पार्श्वभूमीवर बोलताना राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानसह देशातील विरोधकांवरही जोरदार निशाणा साधला.

भारतीय लष्कराने केलेल्या ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करत संरक्षणमंत्री म्हणाले, जे लोक शांतता आणि सलोख्याची भाषा समजत नाहीत, त्यांना त्यांच्याच भाषेत कसे उत्तर द्यायचे, हे भारताला चांगलेच ठाऊक आहे. *(उर्वरित पान २ वर)*

धीरज सेठ नवे लष्करप्रमुख

नवी दिल्ली दि. १३ : केंद्रीय संरक्षण मंत्रालयाने लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांनी मोठी जबाबदारी दिली असून आर्मी प्रमुख पदासाठी त्यांच्या नियुक्तीचे आदेश काढले आहेत. पीव्हीएसएम, यूवायएसएम, एव्हीएसएम आणि सध्या आर्मी स्टाफचे उपप्रमुख म्हणून कार्यरत असलेल्या धीरज सेठ यांना पुढील आर्मी स्टाफ प्रमुख म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे. ३० जून २०२६ च्या दुपारपासून ही नियुक्ती प्रभावीपणे लागू केली जाईल. सध्याचे आर्मी स्टाफ प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी हे याच दिवशी सेवानिवृत्त होत आहेत, त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर लष्करप्रमुख पदावर धीरज सेठ कार्यभार सांभाळणार आहेत.



लेफ्टनंट जनरल धीरज सेठ हे पुण्याच्या खडकवासला येथील नॅशनल डिफेन्स ॲकॅडमीचे माजी विद्यार्थी आहेत. डिसेंबर १९८६ मध्ये त्यांना आर्मर्ड कोरमध्ये प्रमोशन देण्यात आले. सुमारे चार दशकांच्या विशिष्ट सैन्य कारकिर्दीत त्यांना ऑपरेशनल, स्ट्रॅटेजिक, क्षमता विकास आणि संस्थात्मक क्षेत्रांमध्ये व्यापक अनुभव आहे. भारतीय सेनेच्या युद्धक्षमता वाढवणे आणि दीर्घकालीन परिवर्तनात त्यांचा मोठा वाटा आहे. या जनरल अधिकाऱ्याने विविध ऑपरेशनल *(पान २ वर)*

माहोल....

मुंढे साहेब आम्हा भेसळखोरांना पळवून काही फायदा होणार नाही कारण थोड्या दिवसांनी सरकारच तुम्हाला या विभागातून पळवणार आहे...

पतीने पत्नीसह दोन मुलांना संपवून स्वत:लाही संपवल्याचा संशय

वाशिम दि. १३ : वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. तिवळी येथे एकाच कुटुंबातील चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. पत्नी आणि दोन चिमुकल्या मुलांना विहिरीत टाकल्याचा संशय आहे. त्यानंतर पतीनं आत्महत्या केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. संतोष तुकाराम बकाल (वय ३५) यांनी महावितरणच्या पॉवर ग्रीड टॉवरला गळफास घेऊन जीवन संपवलं आहे. मृतांमध्ये पत्नी वर्षा बकाल (वय २८), मुलगी जान्हवी बकाल (वय ७) आणि मुलगा सोहम बकाल (वय ५) *(उर्वरित पान २ वर)*

GENERAL AIR CONDITIONERS
एअर कंडिशनर्स
संपूर्ण मॉडेल्स उपलब्ध
केडिया
C/o केडिया मॉल, श्रीकृष्णपेठ मो. 9049912413

राजा, आता तरी बरस बळीराजाचे देवाला साकडे

मुंबई दि. १३ : राज्यात मान्सून दाखल झाला असला तरी अद्याप पावसाला सुरूवात झालेली नाही. पावसाअभावी शेतकरी अडचणीत सापडू लागला आहे. जूनचा दुसरा आठवडा संपत आला आहे पण अजूनही आभाळाने दार उघडलेलं नाही. पावसाचा एकही थेंब जमिनीवर पडलेला नाही. इकडे शेतकऱ्याने मात्र आशेच्या भरवशावर शेत तयार करून ठेवले आहे. मशागत पूर्ण केली, खत-बियाणे घरात आणून ठेवले, पण आभाळाकडे पाहणारे त्याचे डोळे अजूनही प्रतीक्षेतच आहेत. छत्रपती संभाजीनगरसह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये अशीच स्थिती आहे.

बळीराजासाठी पाऊस म्हणजे केवळ पाणी नाही, तर त्याच्या संसाराचा श्वास आहे. याच पावसावर लेकरांच्या शिक्षणाची स्वप्नं अवलंबून आहेत. *(उर्वरित पान २ वर)*

फडणवीसांकडून ठाकरे गटाच्या या बड्या नेत्याला थेट प्रपोजल

मुंबई दि. १३ : श्रीक्षेत्र भिमाशंकर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कामाची पहाणी करत असताना त्यांच्या एका वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. उद्धव ठाकरे गटाचे पुणे जिल्ह्यातील एकमेव आमदार बाबाजी काळे यांच्यासोबत फोटो काढण्याचा आग्रह वळसे पाटील यांनी फडणवीसांकडे धरला असताना फडणवीसांनी केलेल्या एका सूचक खुलाशामुळे नव्या राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

कार्यक्रमादरम्यान वळसे पाटील यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना बाबाजी काळेंसोबत छायाचित्र काढण्याची विनंती केली. त्यावर फडणवीसांनी मिश्कील शैलीत, फोटोची गरज नाही बाबाजींना आम्ही एक प्रपोजल दिलं आहे, असे वक्तव्य केले. मात्र प्रपोजल नेमकं कशाचं? याबाबत त्यांनी एक शब्दही उच्चारला नाही. विशेष म्हणजे बाबाजी काळे हे उद्धव ठाकरे गटाचे पुणे जिल्ह्यातील एकमेव आमदार आहेत. त्यामुळे देवेंद्र फडणवीसांच्या या वक्तव्याला अधिक राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. हे प्रपोजल केवळ मिश्कील टिप्पणी होती? की त्यामागे काही मोठं राजकीय गणित दडलं आहे, याबाबत आता तर्क-वितर्कांना उधाण आलं आहे.

विशेष म्हणजे शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख *(उर्वरित पान २ वर)*